# सोन्या मारुती

साने गुरुजी

रिया पब्लिकेशन्स्

**सोन्या मारुती : साने गुरुजी**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शितल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
ॐकार मुद्रणालय, कोल्हापूर.

**आवृत्ती**
१५ ऑगस्ट, २०११

**किंमत**
रुपये १३०/-

© सदर पुस्तकातील मजकुराचा हक्क मुक्त आहे; परंतु या पुस्तकातील मांडणी, मुखपृष्ठ किंवा एकंदरीत रचना यांची नक्कल करता येणार नाही, तसेच ट्रेसिंग किंवा निगेटिव्हच्या साहाय्याने छापताही येणार नाही. तसे आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

# सोन्या मारुती
## अर्थात् समाजदृश्ये

## लेखकाचे दोन शब्द

मनुष्य आपापल्या बुद्धीच्या शक्तीने मर्यादित असतो. आपली बुद्धी दाखवील तितकेच त्याला दिसेल. आपल्या स्वत:च्या अंतरंगात अनेक ध्वनी उठत असतात. त्यातील त्या त्या वेळेस जो विशंक असा ध्वनी आपणास वाटतो, तो ध्वनी म्हणजेच त्या वेळचा आपला वेदपुरुष. स्वत:च्या वाढीबरोबर हा वेदपुरुष वाढतो, बदलतो. स्वत:च्या उत्क्रांतीबरोबर आपला सत्यदेवही उत्क्रांत होत असतो.

प्रस्तुत पुस्तकातील वसंता व वेदपुरुष ही दोन्ही माझीच रूपे. हे दोन्ही माझेच आवाज. माझ्याच अंतरंगातील विविध विचारांची व भावनांची ही चर्चा आहे. ती मला सत्य वाटते तितकी दुसऱ्यास वाटणे शक्य नाही. शेवटी सत्य हे स्वत:च्या अनुभवाने मर्यादित असे आपणास प्रतीत होते.

माझे विचार इतरांना पटतील असे मी गृहीत धरीत नाही. ज्यांना पटणार नाहीत ते मजवर टीका करतील, त्यांना तसा पूर्ण अधिकार आहे. त्या टीकेने मला वाईट वाटणार नाही. सार्वजनिक जीवनातील मनुष्याला एक प्रकारे गेंडा व्हावे लागते. टीकांचे आघात त्याच्या पाठीने सहन केले पाहिजेत. गेंडा होण्याचा प्रयत्न मी करीत आहे.

परंतु विचारांवर टीका होणे निराळे आणि तुम्ही दुसऱ्याच्या सांगण्यावरून लिहिता-बोलता असे म्हणणे निराळे. माझ्या विचारावर वाटेल तितकी कटू टीका झाली तरी मी दुसऱ्याच्या सांगण्यावरून लिहिले आहे, असे कोणी मला म्हटले तर मला माझा खून वाटतो. तो भाडोत्रीपणाचा, परप्रत्ययनेयबुद्धीचा आरोप मी सहन करू शकत नाही. पुण्यातील त्रिकाळ दैनिकात तसा आरोप मजवर करण्यात आला होता. त्या आरोपाचा मी तीव्र निषेध करता; परंतु त्या त्रिकाळातील 'खुळचट' गुरुजी म्हणजे साने गुरुजी जर नसतील, तर अर्थातच मला त्यांच्याशी काही कर्तव्य नाही.

धुळ्याचे प्रबोधपंथी सनातनी मला 'साने मुल्ला' वगैरे विशेषणांनी व पदव्यांनी सन्मानित असतात. पुण्याचा सनातनी केसरी 'साने गुरू' म्हणजे 'साने पशू' अशा भूषणांनी माझे कौतुक करीत असतो. त्रिकाळातील 'नि:स्पृह लेखक' या माझ्या श्रमार्जित पदव्या उचलून धरीत आहेत. माझे ध्येय माझ्याजवळ येत आहे. माझ्या

ठिकाणी सर्व धर्म समन्वय झाला तर ते किती छान होईल ! आता रेव्हरंड साने व भिक्षू साने झालो म्हणजे मिळविली. या जन्मानंतर हे साधेल तर कृतार्थ होईन.

माझे पुस्तक प्रसिद्ध होण्यापूर्वीच किंवा त्यातील एखादे प्रकरण अन्यत्र येण्यापूर्वीच येथील दैनिक त्रिकाळात त्यातील प्रकरणांवर कॉलमच्या कॉलम भरून टीका येत आहे. माझे हस्तलिखित टीकाकार नि:स्पृहांनी कोठे कसे पाहिले ! एक दोन छापखान्यांकडे ते वाचावयास दिले होते; परंतु छापखान्यातील व्यवस्थापक असा विश्वासघात करणार नाहीत. तेव्हा नि:स्पृहांनी हे हस्तलिखित कोठेतरी चोरून वाचले असेल; परंतु नि:स्पृहांच्या धार्मिक नीतीत प्रामाणिकपणा, विश्वास ही तत्त्वे नसतीलच. त्यांनी हे जे कुशल चौर्यकर्म केले आहे ते त्यांना साजूनच दिसत आहे !

शेवटी एकच सांगावयाचे की या पुस्तकातील पहिले प्रकरण हे काही महत्त्वाचे प्रकरण नव्हे. पहिले प्रकरण खऱ्या सोन्या मारुतीच्या दर्शनाकडे आपणास नेत आहे इतकेच त्याचे महत्त्व. पहिल्या प्रकरणानंतर होणारी सात दर्शने हीच महत्त्वाची आहेत. देवाची पूजा म्हणजे मानव-पूजा, प्राणिमात्र-पूजा, जोपर्यंत माणूस माणसाला खात आहे, छळीत आहे, पिळीत आहे, गुलाम करीत आहे, तुच्छ-हीन समजत आहे, तोपर्यंत माणसाचे सारे धार्मिक आचार म्हणजे केवळ दंभ होय !

**यज्ञांत उरलें खाती संत ते दोष जाळिती ।**
**रांधिती आपुल्यासाठी पापी ते पाप भक्षिती ।**

असे गीता सांगत आहे. यज्ञ म्हणजे झीज भरून काढणे. सेवेत देह झिजला. त्याला अन्न देऊन त्याची झालेली झीज भरून काढणे म्हणजे यज्ञ करणे होय. 'उदरभरण नोहे जाणिजे यज्ञकर्म' समाजातील सर्व वर्गांनी परस्परांची झीज भरून काढायची असते. अशी झीज भरून काढून जे उरेल ते आपण भोगले पाहिजे. अशी झीज भरून न काढता केवळ आपल्या सुखविलासात दंग असणे म्हणजे अधर्म होय !

असे समाजासाठी आधी यज्ञ करून मग भोगणारे कितीसे धार्मिक लोक सापडतील ? धर्म स्वस्त नाही. धर्म म्हणजे चिरयज्ञ. धर्म म्हणजे त्याग. यज्ञस्वरूपी नारायणाची उपासना करणारे महाराष्ट्रात निघतील तेव्हा सोन्या मारुती संतुष्ट होतील. त्यांच्यासमोर पळीपंचपात्री, खुळखुळे, बँडबाजे वाजण्याचा शिमगा करून ते संतुष्ट होतील असे माझ्या हृदयातील मर्यादित वेदपुरुष आज तरी मला सांगत नाही. उद्याचे कोणाला माहीत ?

**– साने गुरुजी**

# अनुक्रमणिका


| क्र. | प्रकरण शीर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | कोठे आहे सोन्या मारुती ? | ७ |
| २. | पहिले दर्शन | २६ |
| ३. | दुसरे दर्शन | ४५ |
| ४. | तिसरे दर्शन | ५६ |
| ५. | चौथे दर्शन | ६८ |
| ६. | पाचवे दर्शन | ८९ |
| ७. | सहावे दर्शन | १०० |
| ८. | सातवे दर्शन | ११३ |


✦✦

# १. कोठे आहे सोन्या मारुती ?

सोन्या मारुती, सोन्या मारुती ! दोन वर्षे सोन्या मारुती गाजून राहिला आहे. चैत्राचा महिना आला की सोन्या मारुतीचे नाव ऐकू येऊ लागते. वसंत ऋतूत वठून गेलेल्या वृक्षांना पालवी फुटते त्याप्रमाणे या वसंत ऋतूत वठून गेलेल्या सोन्या मारुती प्रकरणाला पालवी फुटत असते. वर्षभर सारे सामसूम असते. वर्षभर जो तो आपापल्या कामात दंग असतो. सारे धर्माभिमानी खान-पान-गान यात तन्मय झालेले असतात; परंतु चैत्र महिना उजाडताच हृदयात सोन्या मारुती जागा होतो. ओठांवर सोन्या मारुती हे शब्द उड्या मारू लागतात. वर्तमानपत्रात-पवित्र सनातनी वर्तमानपत्रात - सोन्या मारुतीचे भुभूःकार ऐकू येऊ लागतात.

निवडणुकीच्या दंगलीत सोन्या मारुतीचे सुंदरकांड बरेच वेळा वाचण्यात येत असे. पुण्याला निवडणूक म्हणजे सोन्या मारुती असेच जणू होऊन गेले होते. ''सोन्या मारुतीचा अभिमान असेल तर मला मत द्या. सोन्या मारुतीला स्मरा व मला पाडू नका. सोन्या मारुतीसमोरची माझी तेजस्वी मूर्ती आठवा व मला विधिमंडळात तेथे सोन्या मारुतीसारख्या प्रकरणात अटीतटीने भांडण्यासाठी निवडून पाठवा. मी म्हणजे सोन्या मारुती. मी म्हणजे सोट्या म्हसोबा. मी म्हणजे सारी हिंदूंची देवळे व मंदिरे. मी तुळशीबाग व पर्वती. मी आळंदी व पंढरपूर. मी काशी-रामेश्वर. मी द्वारका-जगन्नाथपुरी. मी शिरापुरी नाही. शिरापुरीचे भोक्ते अन्य आहेत. मी सोन्यामारुतीचा उपासक. सोन्या मारुतीचा पाईक. सोन्या मारुती म्हणजे एक प्रतीक आहे. मी सोन्या मारुतीचा म्हणजे या चार हात लांबीरुंदीच्या मंदिरापुरताच आहे, असे नाही. मंदिर गगनचुंबी असो वा एखाद्या भिंतीतील कोनाड्यात असो, त्या सर्वांचा

मी संरक्षक आहे. त्या सर्व दगडी मंदिरांवर संकट येणे म्हणजे माझ्या प्राणावर संकट येणे होय. मला तुम्ही निवडा. धर्ममय ज्याचे प्राण आहेत, धर्ममय ज्याचे घटकापळ चालले आहे, अशा माझ्यासारख्या धर्मात्म्याला, धर्मवीराला, धर्मशौंडाला सारी मते द्या. माझा विजय म्हणते तो या सोन्या मारुतीचा विजय ! आणि सोन्या मारुतीचा विजय म्हणजे साऱ्या दगडी तेहतीस कोटी देवांचा विजय !'' असा प्रचार होत असे.

पुण्यातील असा हा सोन्या मारुती आहे तरी कसा याची वसंताला उत्सुकता वाटे. आपण सोन्या मारुती पाहून यावे असे त्याच्या मनात येई. सोन्या मारुतीचा जंगी सत्याग्रह सुरू झाल्यापासून आणि विशेषतः तो खुनशी लाठीमार झाल्यापासून 'सोन्या मारुती सोन्या मारुती' असा जणू जप वसंता करू लागला. सोन्या मारुतीचा सत्याग्रह ! एका पक्षाने चालविलेला तो सत्याग्रह नव्हता. साऱ्या हिंदू समाजाने तो चालविला होता. केवळ लोकशाही पक्षाचा तो नव्हता. तो हिंदू महासभेचाही नव्हता. तो कोणत्या तुटपुंज्या संस्थेचा नव्हता. सोन्या मारुतीचा सत्याग्रह मनात असले तरी का संकुचित पोतडीपुरता ठेवावयाचा ? नाही नाही. हा सर्वांचा सत्याग्रह आहे, सर्व हिंदूंचा हा सत्याग्रह आहे. ज्याला त्याला वाटत असेल की मी हिंदू आहे, त्या सर्वांचा हा सत्याग्रह आहे. हिंदुमात्राला धर्मापेक्षा दुसरे काय प्रिय आहे ! अन्नमय प्राण असे इतर धर्मांचे लोक म्हणोत, परंतु हिंदू म्हटला की धर्ममय प्राण हेच सूत्र डोळ्यांसमोर येते.

वसंता तडफडू लागला. त्याला खाणेपिणे सुचेना. त्याला गाणेबजावणे आवडेना, त्याला बोलपट बघवत ना. तिकडे पुण्याला सोन्या मारुती सत्याग्रह सुरू असता आमच्या या धुळ्यातील लोक खातपीत काय बसले? या धुळ्याला हळदीकुंकू कशी साजरी केली जातात ? टरबुजे, खरबुजे, आंब्याच्या डाळी यांचे गोड समारंभ कसे काय होतात ? सायंकाळी टिळक उद्यानाच्या बाजूला शेकडो स्त्री-पुरुष फिरायला आलेले पाहून वसंता चकित होई. त्या लोकांकडे तो निरखून पाही. मिलमधील मजूर, घामट व डामरट तेथे त्याला दिसत नसत. ते बुद्धिहीन, घाणेरडे, धर्महीन, पोटापुरते पाहणारे किडे, ते तेथे त्याला दिसत नसत. स्वच्छ पोषाख घातलेले, रुबाबदार, पांढरपेशे लोक त्याला दिसत. सनातन धर्माची जपमाळ ओढणारे



हे लोक, येथे फिरायला कसे येतात ? कोणी चिवडा घेऊन खातं, कोणी मिसळ घेतं, कोणी चिरूट ओढीत; कोणी तपकीर कोंबीत, कोणी विडा चघळीत; सारे सनातन धर्माचे कट्टर अभिमानी ! पुण्याला सोन्या मारुतीसमोर जाण्याऐवजी हे येथे कसे ?

वसंताला वाटे की सोन्या मारुतीसंबंधी त्यांच्या चर्चा असतील. आपण त्यांच्या चर्चा ऐकाव्या असे त्याच्या मनात आले. तो जरा एके ठिकाणी थांबला. सोन्या मारुती शब्द तेथे हवेत उच्चाराला गेला होता. वसंताच्या कानाला अमृतस्पर्श झाला आहे, धुळे जिवंत आहे. धुळ्यात मजुरांची धुळधाण झाली तरी धर्माची झाली नाही असे मनात येऊन त्याला समाधान झाले. वसंता ऐकू लागला.

**पहिला** : अहो पुण्याला मी जाणार होतो. येथे अतिच उन्हाळा होतो. सहन नाही होत. वाळ्याच्या ताट्या सोडल्या आहेत तरी अंगाची तलखी होते. भिंतींना हात लाववत नाही, इतक्या तापतात !

**दुसरा** : आपण मजूर हमाल थोडेच आहोत ! ज्याची त्याची संस्कृती भिन्न असते. आपली पांढरपेशी संस्कृती उन्हातान्हात करपून जाईल. मजुराला उन्हातान्हात काही होत नाही; परंतु माझी बबी काल जरा दोन वाजता बाहेर गेली होती, तिला ते सहन झाले नाही. कोमेजून गेली पोर !

**पहिला** : मुलाबाळांना तर येथील उन्हाळा मारकच आहे. या उन्हाळ्यात जगणारी ती का माणसे ? अहो, दगडाच्या सुद्धा उन्हात फुटून लाह्या व्हायच्या ! मग सुकुमार बबीसारख्या फुलांची काय स्थिती होईल, तिची कल्पनाच केलेली बरी. मी पुण्याला जायचे नक्की केले होते; परंतु अकस्मात विघ्न आले.

**दुसरा** : बंगला मिळत नाही वाटते ? अहो पुण्याला पुष्कळ सनातनी बंगले आता झाले आहेत. आजूबाजूला गलिच्छ वस्ती नाही. सर्वत्र स्वच्छता असे बंगले मिळायला आता कठीण नाही. पर्वतीच्या बाजूचे वातावरण आधीच पवित्र आणि त्यात सनातनी लोकांची वाढती वस्ती !

**पहिला** : बंगला वगैरे मिळाला होता. सारी सोय होती; परंतु पुण्याची हकिकत नाही वाटते आली तुमच्या कानावर ?

**दुसरा** : पुण्याला आता सारे सामसूम आहे. निवडणुकीत दंगल होती. सनातनी लोकशाही पक्षाने मात्र शर्थ केली. शेवटपर्यंत त्या धर्मभ्रष्ट काँग्रेसला त्याने